# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ही चिंतेची बाब - कवी सुमंत

**कोरेगाव / प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्रात शिकलेल्या मुलांमध्ये होत असलेल्या आत्महत्या ही चिंतेची बाब आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक, कवी नारायण सुमंत यांनी व्यक्त केले.

येथील डी.पी. भोसले महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील होते.

माणूस हा शक्यतांचा समुद्र असतो. त्या शक्यतेचा शोध माणसांनी घेतला पाहिजे, असे स्पष्ट करुन कवी सुमंत म्हणाले, पुरोगामी महाराष्ट्रात शिकलेल्या मुलांमध्ये आत्महत्या होऊ लागल्या आहेत. ही बाब चिंतेची असून पालकांनी आपल्या पाल्यावरील दहशतवाद थांबविला पाहिजे.

डॉ. दीनानाथ पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, डी.पी. भोसले महाविद्यालय हे जिल्ह्याचे भूषण आहे. पुढच्या पाच वर्षामध्ये हे महाविद्यालय उत्तुंग भरारी घेईल.



**विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करताना कवी नारायण सुमंत, डॉ. दीनानाथ पाटील व इतर.**

यावेळी प्राचार्य शहाजी डोंगरे यांचे भाषण झाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. प्रा. जगन्नाथ शिंदे यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी जिमखाना अहवालाचे वाचन केले. यावेळी क्रीडा, एन.सी.सी. शैक्षणिक, सांस्कृतीक व वक्तृत्व आदी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थी - विद्यार्थिनींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

प्रा. डॉ. विद्या नावंडकर, प्रा. पद्मिनी मोकाशी, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. उमाकांत मुळे यांनी आभार मानले. यावेळी ज्ञानदेव भोसले, बाळासाहेब माने - सरकार, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे, चंद्रकांत बर्गे, रामचंद्र बोतालजी, पालक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

सकाळ
सातारा, मंगळवार, १७ मे २०१६
२

# माजी विद्यार्थ्यांच्या योगदानामुळे महाविद्यालयाची प्रगती : पाटील

## डी. पी. भोसले महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**पळशी, ता. १६ :** माजी विद्यार्थी व माजी प्राध्यापकांच्या योगदानामुळे डी. पी. भोसले महाविद्यालयाची जडणघडण झाली आहे. या महाविद्यालयाच्या विकासासाठी कोरेगाव व परिसरातील शिक्षणप्रेमी कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रमही विसरता येणार नाहीत, असे प्रतिपादन प्राचार्य एस. के. पाटील यांनी केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात आयोजित केलेल्या माजी विद्यार्थी व माजी प्राध्यापकांच्या मेळाव्यात ते बोलत होते. विवेकानंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अशोकराव जगताप, वाशी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी. ए. पाटील, प्राचार्य डॉ. अशोक मगदूम, माजी न्यायाधीश अश्विनीकुमार देवरे, शहाजीराव बर्गे, मानसिंगराव चव्हाण, प्राचार्य वसंत सुतार, अर्जुन भोसले, प्रा. सुनीता वडगावे, बलभीम भोसले, रामचंद्र घारगे, डॉ. दिलीप घोडके, पोलिस उपायुक्त प्रशांत बगाडे, बाजीराव जाधव, बाळासाहेब बाचल, प्राचार्य सोनाप्पा चौगुले, कांचन सावंत यांची भाषणे झाली. 'एक्स डीपीयन्स असोसिएशन'च्या सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांसाठी मदत म्हणून अर्जुन भोसले यांनी सहा महिन्यांचे निवृत्तिवेतन देणार असल्याचे घोषित केले. महाविद्यालयात अद्ययावत दुचाकी स्टँड उभारणीसाठी बाजीराव जाधव यांनी एक लाखाची मदत जाहीर केली. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. पद्मिनी मोकाशी, डी. एम. डांगे, संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. दीपक देवरे यांनी आभार मानले. प्राचार्य अरुण बर्गे, शोभा पाटील, वृषाली मगदूम, बी. एन. गांधी, एच. एस. पवार, सांत्वन शुक्ल, तुकाराम मुळीक उपस्थित होते.